महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८

e-mail> fbranchdmer@gmail.com संकेतस्थळ: http://www.dmer.org

क्र.सवैशिवसं/गट-क (तांत्रिक)/रिक्त पदे/स्पर्धा परिक्षा-२०१४/१-फ/ 22920 /१५, दिनांक: 06/11/२०१५

## जाहिर सूचना

**सरळसेवेने वर्ग-३ (गट-क) (तांत्रिक) संवर्गातील पद भरतीसाठी स्पर्धा परिक्षा-एमईडीएसएस-सीडब्ल्यूटी-२०१४**

या संचालनालयाच्या अधीनस्त संस्थांतील गट-क (तांत्रिक) संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी दि.०१ मार्च, २०१५ रोजी घेतलेल्या एमईडीएसएस-सीडब्ल्यूटी-२०१४ या स्पर्धा परिक्षेतील गुणवत्ता यादीतील उमेदवारांतून रिक्त पदांच्या मर्यादित बोलावण्यात आलेल्या उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी मुंबई तील दोन केंद्रांवर दि.१० जून, २०१५ ते १३ जून, २०१५ या कालावधीत करण्यात आलेली आहे.

सदर प्रमाणपत्र पडताळणीअंती तयार करण्यात आलेली अंतिम गुणवत्तायादी सोबत जाहिर करण्यात येत आहे. प्रमाणपत्र पडताळणीनुसार या यादीत प्रत्येक उमेदवारांच्या नांवासमोर पात्र/अपात्र/गैरहजर (Eligible / Not Eligible / Absent) असल्याबाबतचा शेरा नमूद केलेला आहे. तसेच, सदर स्पर्धा परिक्षेत जाहिर केलेल्या पदांपैकी, सद्यस्थितीत भरण्यासाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदांच्या मर्यादित पात्र उमेदवारांतील गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांच्या नांवासमोर निवड (Silect) असा शेरा नमूद करण्यात आलेला आहे. उर्वरित पात्र उमेदवार प्रतिक्षाधीन (Waiting) उमेदवार राहतील.

निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश लवकरच निर्गमित करण्यात येतील. सदर यादीतील नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत त्यांना दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी तात्काळ हजर रहावे. जे उमेदवार या कालावधीत नियुक्ती स्विकारणार नाहीत त्यांना दिलेली नियुक्ती स्विकारण्यात स्वारस्य नाही, असे समजून त्यांचे नांव नियुक्तीसाठीच्या गुणवत्ता यादीतून वगळण्यात येईल व या संदर्भात तदनंतर प्राप्त झालेली निवेदने/शिफारसी स्विकारल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सदर गुणवत्ता यादीबाबत काही आक्षेप असल्यास ७ दिवसांच्या आंत संचालनालयात लेखी निवेदनासह संपर्क साधावा.

**संचालक,**
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई